# महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

**(औषध व्यवसाय अधिनियम १९४८ च्या अंतर्गत घटित)**
आर-स्क्वेअर, चौथा मजला, राज्य कामगार विमा योजना रुग्णालयासमोर, लाल बहादूर शास्त्री मार्ग, मुलुंड प. मुंबई-४०००८०
दूरध्वनी क्र. २५६८४२९१ , फॅक्स २५६८४४१८ ईमेल - mspcindia@gmail.com वेबसाईट - www.mspcindia.org

## सर्व अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागतांसाठी

## महत्वाची सूचना

**दि.१७.०३.२०२०**

**करोना विषाणूचा प्रसार व लागण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद,मुंबई या कार्यालयामध्ये अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागतांना तात्पुरती प्रवेश बंदी**

सध्या जगभरामध्ये पसरलेल्या करोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली असून सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनातर्फे विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्याचा एक भाग म्हणून मंत्रालयात सर्व प्रकारच्या अभ्यागतांना तात्पुरती प्रवेशबंदी करण्यात आलेली आहे. याच पार्श्वभूमीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद यांच्या आदेशानुसार अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागतांच्या महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या कार्यालयातील प्रवेशावर तात्पुरती बंदी आणण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या मुंबई येथील कार्यालयात भारतातील वेगवेगळया राज्यातून अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागत प्रवास करुन मोठया प्रमाणावर येत असतात. तसेच परदेशातून काही अर्जदार कार्यालयामध्ये येतात. यातून सदर विषाणूचा संसर्ग, प्रसार व लागण होण्याची शक्यता आहे. यामुळे महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या कार्यालयामध्ये पुढील सूचना मिळेपर्यन्त प्रवेश बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**त्यामुळे सर्व अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागतांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी पुढील सूचनेपर्यन्त महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊ नये.** कामकाजाविषयी बहुतांश माहिती संकेतस्थळावर (www.mspcindia.org)उपलब्ध आहे. सदर अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागतांनी तातडीचे काम असल्यास पत्रव्यवहार तसेच ईमेल (mspcindia@gmail.com)द्वारे या कार्यालयाशी संपर्क साधावा अशी नम्र विनंती करण्यात येत आहे.

करोना विषाणूची लागण ही राष्ट्रीय आपत्ती आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या या निर्णयास सर्व अर्जदार, पंजिकृत औषध व्यवसायी व अभ्यागतांनी सहकार्य करुन आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी हि नम्र विनंती.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निवडणूकांसाठी ज्यांना उमेदवारी अर्ज हवा आहे त्यांनी सही केलेले विनंती पत्र पोस्टाने/कुरिअरने अथवा स्कॅन करुन ईमेलद्वारे पाठविण्यात यावे.

निबंधक
महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद, मुंबई

महाराष्ट्र शासन

अतितात्काळ/महत्वाचे

क्र.वैशिवि-२०२०/प्र.क्र.८९/प्रशा-२
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय, आवार
गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला,
लो कमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक:- १२ मार्च, २०२०.

प्रति,

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई
२) संचालक, आयुष संचालनालय,मुंबई
३) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,मुंबई
४) व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन महामंडळ,मुंबई
५) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

विषय:- नोवेल कोरोना व्हायरस (COVID-१९) च्या संसर्गाबाबत.
संदर्भ:- आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Z-२१०२०/१४/२०२०-PH, दि. ०५.०३.२०२०

उपरोक्त विषयी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे.

०२. आपल्या अधिनस्त शासकीय/निमशासकीय/खाजगी सर्व संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात जनसमुदाय एकत्र येतील अशा बैठका/कार्यक्रम/चर्चासत्र/कार्यशाळा/संमेलन/परिषद, पदवीप्रदान समारंभ इत्यादींचे आयोजन न करण्याबाबतच्या सुचना सर्व संबधितांना देण्यात याव्यात. नोवेल कोरोना व्हायरसचा (COVID-१९) प्रसार टाळण्यासाठी संदर्भाधीन पत्रातील मागदर्शक सुचनांचे पुढील आदेशापर्यंत काटकोरपणे पालन करावे. सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत- वरीलप्रमाणे

प्रत- १) मा.मंत्री (वै.शि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री (वै.शि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.सचिव (वै.शि) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई
४) निवडनस्ती प्रशा-२

Scanned by CamScanner